# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या चाळीसाव्या सभेचा कार्यवृत्तांत
## शुक्रवार, दि.०२ मार्च, २०१२ दुपारी १:०० वा.

व्यवस्थापन परिषदेची चाळीसावी सभा मंगळवार दि.२८/०२/२०१२ रोजी दुपारी १:०० वाजता आयोजित करण्यात आलेली होती. सदरची सभा पुढे ढकलण्यात येवून **शुक्रवार, दि.०२/०३/२०१२ रोजी दुपारी १:०० वाजता** व्यवस्थापन परिषद कक्षात मा. कुलगुरू महोदय यांचे अध्यक्षतेखाली झाली.

सभेस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. बंडगर बी. पी. - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | डॉ. सुर्यवंशी ए. बी. | सदस्य |
| ३) | प्रा. डॉ. पाटील टी. आर. | सदस्य |
| ४) | डॉ. श्रीमती अरुणा विंचूरकर, विभागीय सहसंचालिका, सोलापूर विभाग | सदस्या |
| ५) | प्रा. डॉ. लोणीकर एस. व्ही. | सदस्य |
| ६) | प्राचार्य डॉ. शेंडगे आर. एन., संचालक म. व वि. वि. मं. | सदस्य |
| ७) | प्राचार्य श्री. पवार एस. के. | सदस्य |
| ८) | प्राचार्य डॉ. गणगे के. एन. | सदस्य |
| ९) | डॉ. सूर्यवंशी एस. एस. | सदस्य |
| १०) | ॲड. श्री. सलगर बी. एस. | सदस्य |
| ११) | डॉ. कदम एस. डी. | सदस्य |
| १२) | प्राचार्य डॉ. भांजे बी. एम. | सदस्य |
| १३) | डॉ. शेख ए. ए. | सदस्य |
| १४) | श्री. गायकवाड बी. आर. | सदस्य |
| १५) | डॉ. साळुंखे डी. जे., परीक्षा नियंत्रक | कायम निमंत्रित |
| १६) | डॉ. पुजारी डी. डी., वित्त व लेखा अधिकारी | कायम निमंत्रित |
| १७) | कॅप्टन डॉ. सोनजे एन. पी., कुलसचिव | सचिव |

**अनुपस्थिती :**

डॉ. शिळीमकर टी. एन. यांनी व्यवस्थापन परिषदेच्या या सभेस अनुपस्थित रहाणार असल्याचे दूरध्वनीद्वारे कळविले. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेण्यात आली.

**स्वागतः**

कुलसचिवांनी सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले. डॉ. श्रीमती अरुणा विंचूरकर यांची सोलापूर विभागाच्या विभागीय सहसंचालिका यापदी निवड झाल्याने त्यांचा मा.कुलगुरुमहोदयांच्या हस्ते पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला.

**सदर सभेत खालील प्रमाणे कामकाज झाले.**

**[ १ ]** **दि.१२ जानेवारी, २०१२ रोजीच्या एकोणचाळीसाव्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

**ठराव :** दि.१२ जानेवारी, २०१२ रोजीच्या एकोणचाळीसाव्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यात आला व कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.

**[ ०२ ] महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (भ) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा.कुलगुरु यांनी सादर करावयाचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.**

(टिपणीः महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (भ) नुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर).

**ठराव : मा.कुलगुरु यांच्या अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**[ ०३ ] बी. ए. (इंग्रजी) या विषयाच्या परीक्षेत गुणानुक्रमे प्रथम येणा-या स्नातकास "कै. शिवकुमार सिद्रामप्पा कोनापुरे सुवर्णपदक" या नावाने सुवर्णपदक देण्यासाठी प्राप्त झालेली देणगी मा. कुलगुरुमहोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्यावतीने स्वीकारल्याची बाब माहितीस्तव व सुवर्णपदक यादीमध्ये सदरची बाब समाविष्ठ करणेबाबत विचारार्थ.**

(टिपणी - दि. ९/२/२०१२ रोजीच्या पत्रान्वये, डॉ. बी. एस. कोनापुरे, सोलापूर यांचेकडून देणगी रु. १,००,०००/- (धनादेश क्र. ९८०१३१ बँक ऑफ महाराष्ट्र रुपये एक लाख) विद्यापीठास प्राप्त झालेली आहे. सदर देणगी रक्कमेवर येणा-या व्याजातून प्रतिवर्षी दीक्षांत समारंभात प्रस्तुत अर्जात नमूद केल्याप्रमाणे डॉ. बी. एस. कोनापुरे पुरस्कृत - " कै. शिवकुमार सिद्रामप्पा कोनापुरे सुवर्णपदक " या नावाने सुवर्णपदक देण्याची इच्छा व्यक्त केलेली आहे.

**सबब, सदर देणगी स्वीकारण्याची तरतूद महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (h) नुसार असल्याने, मा. कुलगुरुमहोदयांनी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्यावतीने स्वीकारण्याची बाब माहितीस्तव व सुवर्णपदक यादीमध्ये सदरची बाब समाविष्ठ करणेबाबत विचारार्थ)**

ठराव : **अ) मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**ब) बी. ए. (इंग्रजी) या विषयाच्या परीक्षेत गुणानुक्रमे प्रथम येणा-या स्नातकास "कै. शिवकुमार सिद्रामप्पा कोनापुरे सुवर्णपदक" या नावाने सुवर्णपदक देण्यास व सुवर्णपदकांच्या यादीमध्ये समाविष्ट करण्यास मान्यता देण्यात आली.**

**[ ०४ ] प्रस्तुत विद्यापीठाच्या वतीने एप्रिल/मे २०१२ मध्ये घेण्यात येणा-या पीएच.डी कोर्स वर्क या अभ्यासक्रमांचे परीक्षा शुल्क ठरविण्याबाबत परीक्षा मंडळाने केलेली शिफारस विचारार्थ.**

(टिपणी- प्रस्तुत विद्यापीठाच्या वतीने विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली यांनी पारित केलेल्या नवीन निकषप्रणालीनुसार पीएच.डी कोर्स वर्क या अभ्यासक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे. सदरच्या अभ्यासक्रमास सन २०१० मध्ये प्रवेश घेतलेल्या परीक्षार्थींची विद्यापीठाच्या वतीने प्रथमच एप्रिल/मे, २०१२ मध्ये परीक्षा घेण्यात येत असून अद्याप परीक्षा फी किती आकारावी याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात आला नाही. सदर बाब विचारात घेता याप्रकरणी धोरणात्मक निर्णय घेण्याची बाब विषय क्रः- ०६ अन्वये दिनांक-१५/२/२०१२ रोजी झालेल्या परीक्षा मंडळाच्या विचारार्थ ठेवली असता खालीलप्रमाणे ठराव झालेला आहे)

<table>
<tr><td rowspan="3">ठराव क्रः-<br>०६</td><td colspan="3">पीएच.डी कोर्स वर्क अभ्यासक्रमाच्या परीक्षा शुल्काची रक्कम खाली नमुद केल्याप्रमाणे आकारणी करण्याची शिफारस परीक्षा मंडळ व्यवस्थापन परिषेदस करीत आहे.</td></tr>
<tr><td>अ.क्र.</td><td>विद्याशाखा</td><td>शिफारस केलेल्या परीक्षा शुल्काची रक्कम</td></tr>
<tr><td>०१</td><td>पीएच.डी. कोर्स वर्क</td><td>रु-१२००/-</td></tr>
</table>

परीक्षा मंडळाची शिफारस विचारार्थ).

**ठराव : प्रस्तुत विद्यापीठाच्या वतीने एप्रिल/मे २०१२ मध्ये घेण्यात येणा-या पीएच.डी कोर्स वर्क या अभ्यासक्रमांच्या परीक्षा शुल्काची रक्कम रु.१,२००/- आकारणी करण्याबाबत परीक्षा मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन मान्यता देण्यात आली.**

**[ ०५ ] शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून नव्याने सुरु केलेल्या विद्याशाखांच्या सत्र परीक्षेव्यतिरिक्त अन्य विद्याशाखांच्या पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या उत्तरपत्रिका तपासणीच्या मानधनात वाढ करण्याबाबत परीक्षा मंडळाने केलेली शिफारस विचारार्थ.**

(टिपणी- प्रस्तुत विद्यापीठाने जून २०१०-११ पासून नव्याने सुरु केलेल्या विद्याशाखांच्या सत्र परीक्षेव्यतिरिक्त अन्य विद्याशाखांच्या पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या उत्तरपत्रिका तपासणीच्या मानधनात वाढ करण्याची बाब विद्यापीठाच्या विचाराधीन होती. सदर मानधन वाढीची बाब विषय क्रः- १२ अन्वये दिनांक-१५/२/२०१२ रोजी झालेल्या परीक्षा मंडळाच्या विचारार्थ ठेवली असता खालीलप्रमाणे ठराव झालेला आहे.)

ठराव क्रः- १२

सोलापूर विद्यापीठाने जून २०१०-११ पासून नव्याने सुरु केलेल्या विद्याशाखांच्या सत्र परीक्षेव्यतिरिक्त अन्य विद्याशाखांच्या पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या उत्तरपत्रिका तपासणीच्या मानधनात खालीलप्रमाणे वाढ करण्याची शिफारस परीक्षा मंडळ व्यवस्थापन परिषदेस करीत आहे.

| **अ. क्र** | **विद्याशाखा** | **गुण** | **वाढ करण्यासाठी शिफारस दर** |
|---|---|---|---|
| ०१ | अभियांत्रिकी विद्याशाखा - पदवी प्रथम,व्दितीय, तृतिय व चौथ्या वर्षापर्यंत | १०० | रु-१०/- |
| ०३ | अभियांत्रिकी विद्याशाखा- पदव्युत्तर | १०० | रु-१२/- |
| ०४ | बी.बी.ए | ७०/८० | रु-१०/- |
| ०५ | बी.सी.ए | ८० | रु-१०/- |
| ०६ | बी.फार्मसी प्रथम,व्दितीय, तृतिय व चौथ्या वर्षापर्यंत | ८० | रु-१०/- |
| ०७ | एम.फार्मसी | १०० | रु-१२/- |
| ०८ | एम.ए,एम.एड,एम.पी.एड,एम.लीब,एम.फील, एम. एस्सी (सर्व विद्याशाखा) | ७०/१०० | रु-१२/- |
| ०९ | ऑर्किटेचर (प्रथम,व्दितीय, तृतिय व चौथ्या वर्षापर्यंत ) | १०० | रु-१०/- |
| १० | पीएच.डी कोर्से वर्क | १०० | रु-२०/- |
| ११ | कमीत कमी पेपर करिता पेपर तपासणी शुल्क | | रु-१५०/- |

परीक्षा मंडळाची शिफारस विचारार्थ).

**ठराव : शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून नव्याने सुरु केलेल्या विद्याशाखांच्या सत्र परीक्षेव्यतिरिक्त अन्य विद्याशाखांच्या पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या उत्तरपत्रिका तपासणीच्या मानधनात वाढ करण्याबाबत परीक्षा मंडळाने केलेली शिफारस स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.**

**[ ०६ ] प्रस्तुत विद्यापीठाने तीन सत्रामध्ये परीक्षा पध्दती लागू केली असल्याने परीक्षेच्या कार्यप्रणालीत काम करीत असलेल्या वरिष्ठ परीक्षक, कनिष्ठ परीक्षक, कनिष्ठ लिपिक व शिपाई यांच्या मानधनात वाढ करण्याबाबत परीक्षा मंडळाने केलेली शिफारस विचारार्थ.**

(टिपणी- प्रस्तुत विद्यापीठाने तीन सत्र पध्दती लागू केली असल्याने परीक्षेच्या कार्यप्रणालीत काम करीत असलेल्या अधिकारी/ कर्मचारी वर्गाच्या मानधनात वाढ करण्याची बाब विद्यापीठाच्या विचाराधीन होती. याप्रकरणी धोरणात्मक निर्णय घेण्यास्तव विषय क्रः- १४ अन्वये दिनांक-१५/२/२०१२ रोजी झालेल्या परीक्षा मंडळाच्या विचारार्थ ठेवली असता खालीलप्रमाणे ठराव झालेला आहे.)

<table>
<tr><td rowspan="6">ठराव क्रः-१४</td><td colspan="4">सोलापूर विद्यापीठाने तीन सत्र पध्दती परीक्षा सुरु केली आहे. त्यामुळे परीक्षेच्या कामात वाढ झाली असल्याने कामाचे स्वरुप विचारात घेता खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी वर्गाच्या मानधनात वाढ करण्याची शिफारस परीक्षा मंडळ व्यवस्थापन परिषदेस करीत आहे.</td></tr>
<tr><td>अ. क्र</td><td>अधिकारी/कर्मचारी</td><td>सध्याचे मानधन प्रत्येक सत्रासाठी</td><td>वाढ करण्यासाठी शिफारस केलेले दर</td></tr>
<tr><td>०१</td><td>वरिष्ठ परीक्षक</td><td>७०/-</td><td>८०/-</td></tr>
<tr><td>०२</td><td>कनिष्ठ परीक्षक</td><td>४५/-</td><td>५५/-</td></tr>
<tr><td>०३</td><td>कनिष्ठ लिपिक</td><td>४५/-</td><td>५०/-</td></tr>
<tr><td>०४</td><td>शिपाई</td><td>१५/-</td><td>२५/-</td></tr>
</table>

परीक्षा मंडळाची शिफारस विचारार्थ).

**ठराव : प्रस्तुत विद्यापीठाने तीन सत्रामध्ये परीक्षा पध्दती लागू केली असल्याने परीक्षेच्या कार्यप्रणालीत काम करीत असलेल्या वरिष्ठ परीक्षक, कनिष्ठ परीक्षक, कनिष्ठ लिपिक व शिपाई यांच्या मानधनात वाढ करण्याबाबत परीक्षा मंडळाने केलेली शिफारस खालील दुरुस्तीसह स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.**

| **अ.क्र.** | **अधिकारी / कर्मचारी** | **मान्य केलेले दर (प्रत्येक सत्रासाठी)** |
|---|---|---|
| **०१** | **वरिष्ठ परीक्षक** | **१००/-** |
| **०२** | **कनिष्ठ परीक्षक** | **६०/-** |
| **०३** | **कनिष्ठ लिपिक** | **५०/-** |
| **०४** | **शिपाई** | **२५/-** |

## [ ०७ ] सोलापूर विद्यापीठाच्या वतीने घेण्यात येणा-या विज्ञान या विद्याशाखेच्या प्रात्यक्षिक परीक्षेच्या मानधनात वाढ करण्याबाबत परीक्षा मंडळाने केलेली शिफारस विचारार्थ.

(टिपणी- सोलापूर विद्यापीठाच्या वतीने घेण्यात येणा-या विज्ञान या विद्याशाखेच्या प्रात्यक्षिक परीक्षेच्या मानधनात वाढ करण्याची बाब विद्यापीठाच्या विचाराधीन होती. याप्रकरणी धोरणात्मक निर्णय घेण्यास्तव विषय क्र:- १६(१) अन्वये दिनांक-१५/२/२०१२ रोजी झालेल्या परीक्षा मंडळाच्या विचारार्थ ठेवली असता खालीलप्रमाणे ठराव झालेला आहे.)

| ठराव क्र:- १६(१) | सोलापूर विद्यापीठाच्या वतीने घेण्यात येणा-या विज्ञान या विद्याशाखेच्या प्रात्यक्षिक परीक्षेच्या व पेपर सेटींगच्या मानधनात खालील प्रमाणे वाढ करण्याची शिफारस परीक्षा मंडळ व्यवस्थापन परिषदेस करीत आहे. |
|---|---|

| अ. क्र | तपशिल | सध्याचे मानधन एका विषयासाठी | वाढ करण्यासाठी शिफारस केलेले दर |
|---|---|---|---|
| | **प्रात्यक्षिक परीक्षेचे मानधन** | | |
| ०१ | विज्ञान भाग-१ सर्व विषय, प्रत्येक विद्यार्थ्यास (एका दिवसासाठी ) | १७/- | २४/- |
| ०२ | विज्ञान भाग-२ सर्व विषय, प्रत्येक विद्यार्थ्यास (दोन दिवसासाठी) | २५/- | ३६/- |
| ०३ | विज्ञान भाग- ३ सर्व विषय, प्रत्येक विद्यार्थ्यास (तीन दिवसासाठी ) | ४०/- | ४८/- |
| ०४ | प्रयोगशाळा निरीक्षक प्रति दिन | ९०/- | १००/- |
| ०५ | प्रयोगशाळा तज्ञ प्रति दिन | ४०/- | ६०/- |
| ०६ | प्रयोगशाळा सहायक प्रति दिन, बी.एस्सी भाग-१, २,३ तसेच एम.एस्सी भाग-१ व २ | २०/- | ४०/- |
| ०८ | प्रयोगशाळा परिचर प्रति दिन | १५/- | ३०/- |
| ०९ | एम.एस्सी भाग - १ व २, सर्व विषयासाठी, एम.ए - भूगोल / मानसशास्त्र सर्व विषयासाठी, प्रत्येक विद्यार्थी, प्रत्येक परीक्षक, प्रत्येक प्रात्यक्षिक परीक्षेस (प्रायोगिक संशोधन), प्रति दिन. | ०७/- | १०/- |
| १० | भूगोल/ मानसशास्त्र बी.ए भाग-३, प्रत्येक विद्यार्थ्यासाठी | १५/- | ३५/- |
| ११ | शारिरीक शिक्षणशास्त्र अनिवार्य बी.ए भाग-१ प्रत्येक विद्यार्थ्यासाठी | ०३/- | ५/- |
| १२ | शारिरीक शिक्षणशास्त्र ऐच्छीक बी.ए भाग-२ प्रत्येक विद्यार्थ्यासाठी | ०४/- | ५/- |
| १३ | शारिरीक शिक्षणशास्त्र ऐच्छीक बी.ए भाग-३ प्रत्येक विद्यार्थ्यासाठी | ०५ | ५/- |
| | | | (कृ.मा.प...) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | पेपर सेटींगचे मानधन | | | |
| | ०१ | पदवी (वार्षिक /सत्र ) परीक्षा पध्दती ७०/८०/१०० | १६५/- | २००/- |
| | ०२ | पदव्युत्तर (वार्षिक /सत्र ) परीक्षा पध्दती ७०/८०/१०० | २२०/- | २५०/- |
| | ०३ | पदवी सत्र परीक्षा पध्दती -५० मार्क | १००/- | - |
| | ०४ | पदव्युत्तर सत्र परीक्षा पध्दती -५० मार्क | ११०/- | - |
| | ०५ | एम.फील | २२०/- | ३००/- |
| | ०६ | पीएच.डी (कोर्स वर्क ) | २२०/- | ४००/- |

परीक्षा मंडळाची शिफारस विचारार्थ).

**ठराव :** **सोलापूर विद्यापीठाच्या वतीने घेण्यात येणा-या विविध विद्याशाखेच्या प्रात्यक्षिक परीक्षेच्या व पेपर सेटिंगच्या मानधनात वाढ करण्याबाबत परीक्षा मंडळाने केलेली शिफारस खालील दुरुस्तीसह स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.**

| **अ. क्र** | **तपशील** | **सध्याचे मानधन एका विषयासाठी** | **मान्य करण्यात आलेले दर** |
|---|---|---|---|
| ०१ | विज्ञान भाग-१ सर्व विषयास प्रत्येक परीक्षार्थी विद्यार्थ्यामागे | १७/- | २०/- |
| ०२ | विज्ञान भाग-२ सर्व विषयास प्रत्येक परीक्षार्थी विद्यार्थ्यामागे | २५/- | ४४/- |
| ०३ | विज्ञान भाग- ३ सर्व विषयास प्रत्येक परीक्षार्थी विद्यार्थ्यामागे | ४०/- | ७२/- |

## [ ०८ ] सोलापूर विद्यापीठाचा सन २०१०-११ चा वार्षिक मराठी अहवाल विचारार्थ.

(टिपणी : महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम २८(गग) नुसार, खालीलप्रमाणे तरतूद आहे.

| |
|---|
| वार्षिक अहवाल, वार्षिक लेखे व लेखापरीक्षा अहवाल यांच्यावर विचार करणे व ते स्वीकारणे आणि ते अधिसभेकडे मान्यतेसाठी पाठविणे. |

सबब, सन २०१०-११ चा वार्षिक अहवाल तयार करण्यासाठी खालील समितीचे गठण केलेले होते.

| | | |
|---|---|---|
| १) | डॉ. लोणीकर एस. व्ही. | अध्यक्ष |
| २) | डॉ. इंगोले कृष्णा | सदस्य |
| ३) | डॉ. कदम एस. डी. | सदस्य |
| ४) | डॉ. श्रीमती याजमान्य एस. आर. | सदस्या |
| ५) | डॉ. श्रीमती ॲनी जॉन | सदस्या |
| ६) | श्रीमती चोपडे ए. बी. सहायक कुलसचिव | सदस्य सचिव |

उक्त समितीने महाविद्यालये, विद्यापीठ संकुले व प्रशासनाकडून मागवून घेतलेल्या माहितीवर एकत्रित विचार करुन, वेळोवेळी बैठका घेऊन, सदरचा मराठी अहवाल तयार करुन, व्यवस्थापन परिषदेकडे मान्यता देण्याबाबतच्या कार्यवाहीसाठी शिफारस केलेली आहे. व्यवस्थापन परिषदेच्या शिफारशीनंतर सदरच्या अहवालास अधिसभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम १०४ (१) व १०४ (२) ची तरतूद खालीलप्रमाणे-

Section १०४(१)

| |
|---|
| The Annual Report of the university shall be prepared and published by the university and such report as approved by the Management Council shall be submitted to the Chancellor, State Government and Senate. The Senate may consider the annual report in its meeting and may take recommendations as it deems fit. The Management Council shall take appropriate action on the recommendation of the Senate and report the action taken to the Senate. |

Section १०४ (२)

| |
|---|
| namely- (z) The State Government shall cause the annual report of the university, received by it, to be laid before each House of the State Legislature. |

सबब, २०१०-११ साठीचा वरील समितीने तयार केलेला वार्षिक अहवाल विचारार्थ).

**ठराव : सोलापूर विद्यापीठाचा सन २०१०-११ चा वार्षिक मराठी अहवाल स्विकारुन अधिसभेस मान्यतेची शिफारस करण्यात आला.**

**[ ०९ ] विद्यापीठ परिसरातील कॉम्प्युटेशनल सायन्स इमारतीच्या गच्चीवर बसविण्यात आलेल्या बी.एस.एन.एल. मोबाईल टॉवरचे दरमहाचे भाडे आकारण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी : विद्यापीठ परिसरातील इमारतीच्या गच्चीवर बी.एस.एन.एल. कंपनीचे मोबाईल टॉवर बसविण्यात आले आहे. या मोबाईल टॉवरकरीता सोलापूर शहरातील टॉवरसाठी रु.८,०००/- प्रचलित भाडे व ५०० चौ.फूट जागेसाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या प्रचलित दरानुसार रु.३/- प्रति चौ.फूट प्रमाणे रु.१,५००/- असे एकूण रक्कम रु.९,५००/- दरमहा या दराने घेण्याबाबत मा.कुलगुरुमहोदयांच्या मान्यतेनुसार बी.एस.एन.एल. कार्यालयास दि.१३/०२/२००८ रोजी कळविण्यात आले होते. तथापि विद्यापीठ कार्यालयास भारत संचार निगम लि. सोलापूर यांनी दि.३१/०३/२००८ रोजीच्या पत्रान्वये दरमहा रक्कम रु.५,०००/- भाडे घेण्याची स्वीकृती देण्यात आलेली आहे. यास्तव विद्यापीठ कार्यालयाकडून रु.९,५००/- ऐवजी रु.५,०००/- भाडे जमा होत असल्याने उर्वरीत रक्कम रु.४,५००/- बाबत पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे.

यानंतर मा.कार्यकारी अभियंता (सिव्हील) बी.एस.एन.एल. सिव्हील डिव्हीजन, सोलापूर बी.एस.एन.एल. अभियांत्रिकी विभाग यांनी मोबाईल टॉवर भाडे दरमहा रु.५,०००/- चे एफ.आर.ए.सी. यांनी मूल्यमापन करुन देण्यात आले आहे. तसेच सदरच्या मोबाईल टॉवर भाडेविषयी सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे विचारणा केली असता सदरचे भाडे विहित असल्याबाबत सांगण्यात आले आहे. सदरची बाब माहितीस्तव सादर.

सबब, एफ.आर.ए.सी. भारत संचार निगम लि. सोलापूर यांच्याकडून मोबाईल टॉवर भाडे दरमहा रक्कम रु.५,०००/- इतके घेण्याविषयी कळविल७ोली बाब विचारार्थ).

**ठराव : विद्यापीठ परिसरातील कॉम्प्युटेशनल सायन्स इमारतीच्या गच्चीवर बसविण्यात आलेल्या बी.एस.एन.एल. मोबाईल टॉवरचे दरमहाचे भाडे रु.५,०००/- आकारण्यास मान्यता देण्यात आली.**

**[ १० ] अभ्यासकेंद्राकडील व विद्यापीठ परिसरातील अतिथीगृहाचे सुधारीत दर ठरविण्याबाबत विचारार्थ.**

(टिपणी: विद्यापीठाकडील अभ्यासकेंद्राच्या परिसरात असणाऱ्या अतिथीगृहाचे सध्याचे दर इतर विद्यापीठाच्या तुलनेने कमी असल्याने महाराष्ट्रातील अकृषि विद्यापीठाकडून अतिथीगृहाचे दर मागविण्यात आलेले होते. प्राप्त दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | विद्यापीठाचे नाव | निवासाचा प्रकार | प्रतिदिन प्रतिव्यक्ती निवासाचे दर (रु) | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | विद्यापीठाच्या कामानिमित्त | खाजगी कामानिमित्त | बाहेरील व्यक्ती (खाजगी व्यक्ती / संस्था) |
| १) | उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव | सर्वसाधारण | ३०/- | ७५/- | १५०/- |
| | | निमवातानुकूलित | ७५/- | १५०/- | ३००/- |
| | | वातानुकूलित | १५०य/- | ३००/- | ५००/- |
| २) | यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | सर्वसाधारण | ५०/- | १५०/- | --- |
| | | निमवातानुकूलित | --- | --- | --- |
| | | वातानुकूलित | १५०/- | --- | ८००/- |
| ३) | स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड | सर्वसाधारण | ५०/- | --- | --- |
| | | निमवातानुकूलित | १००/- | --- | --- |
| | | वातानुकूलित | २००/- | --- | --- |
| ४) | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद | सर्वसाधारण | ५०/- | --- | --- |
| | | निमवातानुकूलित | --- | --- | --- |
| | | वातानुकूलित | २००/- | --- | --- |
| ५) | शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | सर्वसाधारण | २५/- | ७५/- | ७५/- |
| | | निमवातानुकूलित | --- | --- | --- |
| | | वातानुकूलित | ५०/- | ३००/- | ३००/- |
| **अभ्यासकेंद्राकडील अतिथीगृहाचे सध्याचे दर** | | | | | |
| १) | सोलापूर विद्यापीठ | सर्वसाधारण | २५/- | १००/- | १००/- |

उपरोक्तप्रमाणे अभ्यासकेंद्राकडील व विद्यापीठ परिसरातील अतिथीगृहाचे सुधारीत दर ठरविण्याबाबत विचारार्थ).

**ठराव : अभ्यासकेंद्राकडील व विद्यापीठ परिसरातील अतिथीगृहाचे सुधारीत दर खालीलप्रमाणे ठरविण्यास मान्यता देण्यात आली.**

| अ. क्र. | निवासाचा प्रकार | विद्यापीठाच्या कामानिमित्त | खाजगी / महाविद्यालयीन कामानिमित्त | बाहेरील व्यक्ती (खाजगी व्यक्ती / संस्था) |
|---|---|---|---|---|
| **१)** | **सर्वसाधारण** | **२५/-** | **७५/-** | **१००/-** |

**[ ११ ] अभ्यासकेंद्राकडील व विद्यापीठ परिसरातील अतिथीगृहामध्ये संवैधानिक अधिकारी वास्तव्यास आल्यास त्यांना शुल्क न आकारण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी : महाराष्ट्रातील इतर काही विद्यापीठांमध्ये संवैधानिक अधिकारी अतिथीगृहामध्ये वास्तव्यास गेले असता, त्यांना शुल्क आकारण्यात येत नाही. बऱ्यावेळा या संदर्भात लेखापरीक्षणावेळी त्रुटी निदर्शनास येते ही बाब लक्षात घेता, महाराष्ट्रातील विद्यापीठाकडील संवैधानिक अधिकारी अभ्यासकेंद्राकडील व विद्यापीठ परिसरातील अतिथीगृहामध्ये वास्तव्यास आल्यास त्यांना शुल्क न आकारण्याची बाब विचारार्थ).

**ठराव :** **अ) अभ्यासकेंद्राकडील व विद्यापीठ परिसरातील अतिथीगृहामध्ये इतर विद्यापीठातील संवैधानिक अधिकारी वास्तव्यास आल्यास त्यांना निवास शुल्क न आकारण्यास मान्यता देण्यात आली.**

**ब) अभ्यासकेंद्राकडील व विद्यापीठ परिसरातील अतिथीगृहामध्ये इतर शासकीय अधिकारी विद्यापीठ कामासाठी वास्तव्यास आल्यास त्यांना निवास शुल्क न आकारण्यास मान्यता देण्यात आली.**

**[ १२ ] वाणिज्य विद्याशाखांतर्गत B.C.A.या कोर्सच्या Standard of Passing Rules मधील सुधारणा व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी - Business Management या अभ्यासमंडळाच्या दि. १९/१/२०१२ रोजीच्या बैठकीत ठराव क्र. २ नुसार B.C.A. या कोर्सच्या Standard of Passing Rules मध्ये केलेली सुधारणा अभ्यासमंडळाने स्वीकारुन, विद्याशाखेकडे शिफारस केलेली आहे.

वाणिज्य विद्याशाखेचे अधिष्ठाता यांनी दि.१४/२/२०१२ रोजीच्या पत्रान्वये, उक्त कोर्सच्या Standard of Passing Rules मधील सुधारणा विद्याशाखेच्या वतीने स्वीकारुन, विद्यापरिषदेकडे शिफारस केलेली आहे.

B.C.A. या कोर्सच्या Standard of Passing Rules मध्ये केलेल्या सुधारणेस मा. कुलगुरु महोदयांनी म. वि. का. १९९४ कलम १४ (७) नुसार विद्यापरिषदेच्या वतीने स्वीकारुन, व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस केलेली आहे.

**वाणिज्य विद्याशाखांतर्गत B.C.A. या कोर्सच्या Standard of Passing Rules मधील सुधारणा व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).**

**ठराव : वाणिज्य विद्याशाखांतर्गत B.C.A.या कोर्सच्या Standard of Passing Rules मधील सुधारणास मान्यता देण्यात आली.**

**[ १३ ] वाणिज्य विद्याशाखांतर्गत B.B.A. या अभ्यासक्रमासाठीचा अध्यादेश क्र. २१ मधील O.B.B.A.4, 6 नुसार Practical Mangt. I, II, Mini Project- I, II marks & Standard of Passing Rules मधील सुधारणा व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी - Business Management या अभ्यासमंडळाच्या दि. १९/१/२०१२ रोजीच्या बैठकीत ठराव क्र. २ नुसार B.B.A. या कोर्सच्या O.B.B.A.4, 6 नुसार Practical Mangt. I ,II, Mini Project- I ,II marks & Standard of Passing Rules सुधारीत केलेले अध्यादेश अभ्यासमंडळाने स्वीकारुन, विद्याशाखेकडे शिफरास केलेली आहे.

वाणिज्य विद्याशाखेचे अधिष्ठाता यांनी दि.१४/२/२०१२ रोजीच्या पत्रान्वये, उक्त कोर्सच्या अध्यादेशामध्ये म. वि. का. १९९४ कलम ५४ (१) नुसार केलेली सुधारणा विद्याशाखेच्या वतीने स्वीकारुन, विद्यापरिषदेकडे शिफारस केलेली आहे.

उक्त बाबीस मा. कुलगुरुमहोदयांनी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४ (७) नुसार, विद्यापरिषेदच्या वतीने मान्यता देऊन, व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस केलेली आहे.

**वाणिज्य विद्याशाखांतर्गत B.B.A. या अभ्यासक्रमासाठीचा अध्यादेश क्र. २१ मधील O.B.B.A.4, 6 नुसार Practical Mangt. I, II, Mini Project- I, II marks & Standard of Passing Rules मधील सुधारणा व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).**

**ठराव : वाणिज्य विद्याशाखांतर्गत B.B.A. या अभ्यासक्रमासाठीचा अध्यादेश क्र. 21 मधील O.B.B.A.4, 6 नुसार Practical Mangt. I, II, Mini Project- I, II marks & Standard of Passing Rules मधील सुधारणांस मान्यता देण्यात आली.**

**[ १४ ] वाणिज्य विद्याशाखांतर्गत P.G.D.C.A. या अभ्यासक्रमासाठीचा अध्यादेश क्र. 23 मधील O.PG.D.C.A. 2 नुसार Project Work- Marks Scheme मधील सुधारणा व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी - Business Management या अभ्यासमंडळाच्या दि. १९/१/२०१२ रोजीच्या बैठकीत ठराव क्र. २ नुसार P.G.D.C.A. या अभ्यासक्रमासाठीचा अध्यादेश क्र. २३ मधील O.P.G.D.C.A. 2 नुसार Project Work- Marks Scheme मधील सुधारणा अभ्यासमंडळाने स्वीकारुन, विद्याशाखेकडे शिफरास केलेली आहे.

वाणिज्य विद्याशाखेचे अधिष्ठाता यांनी दि.१४/२/२०१२ रोजीच्या पत्रान्वये, उक्त कोर्सच्या अध्यादेशामध्ये म. वि. का. १९९४ कलम ५४ (१) नुसार केलेली सुधारणा विद्याशाखेच्या वतीने स्वीकारुन, विद्यापरिषदेकडे शिफारस केलेली आहे.

उक्त बाबीस मा. कुलगुरुमहोदयांनी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४ (७) नुसार, विद्यापरिषेदच्या वतीने मान्यता देऊन, व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस केलेली आहे.

**वाणिज्य विद्याशाखांतर्गत P.G.D.C.A. या अभ्यासक्रमासाठीचा अध्यादेश क्र. २३ मधील O.PG.D.C.A. 2 नुसार Project Work- Marks Scheme मधील सुधारणा व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).**

**ठराव : वाणिज्य विद्याशाखांतर्गत P.G.D.C.A. या अभ्यासक्रमासाठीचा अध्यादेश क्र. 23 मधील O.PG.D.C.A. 2 नुसार Project Work- Marks Scheme मधील सुधारणांस मान्यता देण्यात आली.**

**[ १५ ] वाणिज्य विद्याशाखांतर्गत M.B.A. या कोर्सच्या Standard of Passing Rules मधील सुधारणा व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी - Business Management या अभ्यासमंडळाच्या दि. १९/१/२०१२ रोजीच्या बैठकीत ठराव क्र. २ नुसार M.B.A. या कोर्सच्या Standard of Passing Rules मध्ये केलेली सुधारणा अभ्यासमंडळाने स्वीकारुन, विद्याशाखेकडे शिफरास केलेली आहे.

वाणिज्य विद्याशाखेचे अधिष्ठाता यांनी दि.१४/२/२०१२ रोजीच्या पत्रान्वये, उक्त कोर्सच्या Standard of Passing Rules मधील सुधारणा विद्याशाखेच्या वतीने स्वीकारुन, विद्यापरिषदेकडे शिफारस केलेली आहे.

M.B.A. या कोर्सच्या Standard of Passing Rules मध्ये केलेल्या सुधारणेस मा. कुलगुरु महोदयांनी म. वि. का. १९९४ कलम १४ (७) नुसार विद्यापरिषदेच्या वतीने स्वीकारुन, व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस केलेली आहे.

**वाणिज्य विद्याशाखांतर्गत M.B.A. या कोर्सच्या Standard of Passing Rules मधील सुधारणा व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).**

**ठराव : वाणिज्य विद्याशाखांतर्गत M.B.A. या कोर्सच्या Standard of Passing Rules मधील सुधारणांस मान्यता देण्यात आली.**

**[ १६ ] सन २०१०-११ चा वार्षिक मराठी अहवाल छपाई करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणीः महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम १०४ या तरतूदीनुसार, सोलापूर विद्यापीठाचा सन २०१०-११ चा मराठी भाषेतील वार्षिक अहवाल तयार करण्यात आला असून सदर अहवालाच्या एकूण १२०० प्रती छपाई करण्यासाठी दि.११/०२/२०१२ रोजीच्या दै. पुण्यनगरी व दै. संचार या वृत्तपत्रातून अल्पमुदतीची जाहीर निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार एकूण ३ छपाईदाराकडून निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्यानुसार प्राप्त निविदांच्या तुलनात्मक तक्त्यानुसार (सोबत जोडल्यानुसार) न्यूनतम दर असलेले मे. अनिल प्रिंटींग प्रेस, सोलापूर यांच्याशी वाटाघाटी केल्यानंतर मे. अनिल प्रिंटींग प्रेस, सोलापूर यांनी प्रति नग रु.१००/- प्रमाणे छपाई करुन देण्याची तयारी दर्शविली आहे. एकूण १२०० प्रती छपाई करुन घ्यावयाच्या असून याकरिता रु.१,२०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

वार्षिक अहवाल छपाई ही खरेदी नसून सेवा आहे. याबाबत व्यवस्थापन परिषदेच्या दि.२१ जुलै, २०११ रोजीच्या विषय क्र. २१ वरील ठरावानुसार, शै. वर्ष २०१०-११ चा वार्षिक अहवाल छपाई मे. अनिल प्रिंटींग प्रेस, सोलापूर यांच्याकडून रु.१००/- प्रति नग या दराने छपाई करुन घेण्याबाबत विचारार्थ).

**ठराव : सन २०१०-११ चा वार्षिक मराठी अहवाल तुलनात्मक तक्त्यानुसार न्यूनतम दर असलेले मे. अनिल प्रिंटींग प्रेस, सोलापूर यांच्याकडून रु.१००/- प्रति नग या दराने छपाई करुन घेण्यास मान्यता देण्यात आली.**

**[ १७ ] महाराष्ट्र शासनाच्या दि.१४ सप्टेंबर, २००९ रोजीच्या शासन राजपत्रानुसार, विविध अधिकारमंडळावर निवडून, नामनिर्देशनाद्वारे, स्वीकृत सदस्य म्हणून येण्याकरीता पात्रतेच्या अटी व शर्तीच्या परिनियमांबाबत व दीक्षांतसंदर्भात परिनियमांबाबत परिनियम समितीने केलेली शिफारस विचारार्थ.**

(टिपणीः सोलापूर विद्यापीठाची स्थापना महाराष्ट्र शासनाच्या दि.२२ जुलै, २००४ रोजीच्या अधिसूचनेनुसार झालेली आहे. दि.२२ जुलै, २००४ रोजीच्या अधिसूचनेतील खालील कलमान्वये,
**(एक) या कलमान्वये शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांनी तयार केलेले केलेले परिनियम, अध्यादेश, विनियम आणि नियम यांचे सोलापूर विद्यापीठ सोलापूर यांच्याकडून उक्त अधिनियमाखालील अधिकारांचा वापर करुन अधिक्रम करण्यात येईपर्यंत किंवा त्यात फेरबदल करण्यात येईपर्यंत, ते अंमलात असणे चालू राहील आणि ते, उक्त अधिनियमान्वये सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्याकडून करण्यात आल्याचे मानण्यात येईल;**
वरील कलमानुसार, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांचेच परिनियम सोलापूर विद्यापीठाचे परिनियम म्हणून सध्या वापरण्यात येत आहेत. महाराष्ट्र शासनच्या दि.१४ सप्टेंबर, २००९ रोजीच्या शासन राजपत्रानुसार, विविध अधिकारमंडळावर निवडून, नामनिर्देशनाद्वारे, स्वीकृत सदस्य म्हणून येण्याकरीता पात्रतेच्या अटी व शर्ती पारीत केलेल्या आहेत. या अटी व शर्ती लागू करण्याकरीता मा.कुलगुरुमहोदयांनी महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम १४(८) नुसार ऑर्डर काढलेली होती. सोलापूर विद्यापीठाने शिवाजी विद्यापीठाचे असलेले परिनियम क्र. S.382 ते S.467 यामध्ये बदल करुन नव्याने सोलापूर विद्यापीठाचे परिनियम व त्याचे क्रमांक **SUSS.301 ते SUSS.387** असे आवश्यक ते बदल केलेले आहेत. तसेच शिवाजी विद्यापीठाचे दीक्षांतसंदर्भात असलेले परिनियम क्र. S.546 ते S.549 यामध्ये बदल करुन नव्याने सोलापूर विद्यापीठाचे परिनियम व त्याचे क्रमांक **SUSS.388** ते **SUSS.391** असे आवश्यक ते बदल केलेले आहेत.

सबब, परिनियम समितीने शिफारस केलेले सोलापूर विद्यापीठाचे परिनियम क्रमांक SUSS.301 ते SUSS.387 व SUSS.388 ते SUSS.391 हे महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम २८ (सी) नुसार स्विकारुन अधिसभेस परिनियम क्र.४७४(१०) अन्वये शिफारस करण्याबाबत विचारार्थ).

**ठराव : अ) सोलापूर विद्यापीठाने नव्याने तयार केलेले परिनियम क्रमांक SUSS.301, 303, 305, 306, 309, 310, 313, 314, 318 ते 340, 341 ते 391 व या अनुषंगाने परिशिष्ट II, III, IV, V बाबत परिनियम समितीने केलेली शिफारस स्विकारुन अधिसभेस मान्यतेची शिफारस करण्यात आली.**

**ब) विद्यापीठाचे नविन परिनियम तयार करताना महाराष्ट्र शासन राजपत्र दि.१४/०९/२००९ मध्ये काही अतिरिक्त बाबींचा समावेश करता येईल का याबाबत योग्य ती माहिती प्राप्त करावी.**

**[ १८ ] वित्त व लेखा समितीच्या दि.१७/०२/२०१२ च्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत विचारार्थ.**

(टिपणी : दि.१७/०२/२०१२ रोजीच्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत सोबत जोडलेला आहे. तो दि.२१/०२/२०१२ च्या वित्त व लेखा समितीच्या बैठकीत शिफारशीसाठी सादर केला असता त्यांनी खालील प्रमाणे शिफारस केली आहे.

अ) खरेदी समिती ठराव क्र.२ ते ८ साठी ज्या पुरवठादारांनी निविदा भरलेल्या आहेत त्या पुरवठादाराकडे प्रत्यक्ष भेट देवून, पुरवठादारांची काम करण्याची पात्रता वापरण्यात येणाऱ्या साहित्यांचा दर्जा व यापूर्वी त्यांनी केलेली काम इत्यादी बाबींची तपासणी करण्यासाठी खालील समिती गठीत करण्याचे ठरले.

१) श्री. बी. आर. गायकवाड २) डॉ. आर. आर. पाटील

३) श्री. साळुंखे पी. व्ही. ४) श्री. गिरीश कूलकर्णी, विद्यापीठ अभियंता

उपरोक्त समितीने गुणानुक्रमे अहवाल पुढील सभेत सादर करण्याचे ठरले.

ब) खरेदी समिती ठराव क्र.९ (१) ला मन्यतेसाठी शिफारस करण्यात आली.

सबब, दि.१७/०२/२०१२ रोजीच्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

ठराव : **वित्त व लेखा समितीच्या दि.१७/०२/२०१२ च्या खरेदी समितीच्या कार्यवृत्तांताबाबत खालीलप्रमाणे मान्यता देण्यात आली.**

**अ) खरेदी समितीचा ठराव क्र.२ ते ८ साठी वित्त व लेखा समितीने नियुक्त समिती बाबतची नोंद घेण्यात आली.**

**ब) खरेदी समितीचा ठराव क्र.९ (१) नुसार खरेदीस मान्यता देण्यात आली.**

**[ १९ ] सन २०११-१२ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २०१२-१३ चे मूळ अंदाजपत्रक मंजूरीची बाब विचारार्थ.**

(टिपणी : महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ७५(२) (e) & १०१ नुसार वित्त व लेखा अधिकारी यांनी तयार केलेले विद्यापीठाने सन २०११-१२ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २०१२-१३ चे मूळ अंदाजपत्रक दि.२१/०२/२०१२ रोजीच्या वित्त व लेखा समितीसमोर सादर करण्यात आले, त्यास वित्त व लेखा समितीने काही दुरुस्तीसह व्यवस्थापन परिषदेस शिफारस केली आहे.

सबब, सन २०११-१२ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २०१२-१३ चे मूळ अंदाजपत्रक व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

**ठराव : सन २०११-१२ च्या सुधारीत अंदाजपत्रक व २०१२-१३ च्या मूळ अंदाजपत्रकाबाबत वित्त व लेखा समितीने दुरुस्तीसह केलेली मान्यतेची शिफारस स्विकारण्यात येवून अधिसभेस मान्यतेची शिफारस करण्यात आली.**

**[ २० ] महाराष्ट्र शासनाने, विद्यापीठ अनुदान आयोग व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या शिफारशीनुसार राज्यात उच्च व तंत्रशिक्षण क्षेत्रात कार्यरत पदवी, पदव्युत्तर व पदविका संस्था तसेच अकृषी विद्यापीठे, तंत्रशास्त्र विद्यापीठ यातील अध्यापक व प्राचार्य पदांच्या नियतवयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या वयोमर्यादेत वाढ करण्याबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०११/(३९६/११)विशि-१, दिनांक ०१-१२-२०११ व २३-११-२०११ माहितीस्तव.**

(टिपणी : महाराष्ट्र शासनाने, विद्यापीठ अनुदान आयोग व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या शिफारशीनुसार राज्यात उच्च व तंत्रशिक्षण क्षेत्रात कार्यरत पदवी, पदव्युत्तर व पदविका संस्था तसेच अकृषी विद्यापीठे, तंत्रशास्त्र विद्यापीठ यातील अध्यापक व प्राचार्य पदांच्या नियतवयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या वयोमर्यादेत वाढ करण्याबाबत, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०११/(३९६/११)विशि-१, दिनांक ०१-१२-२०११ व २३-११-२०११ अन्वये कळविले आहे.

प्रस्तुत विषय विद्या परिषदेच्या दि.०३-०१-२०१२ रोजीच्या बैठकीत विषय क्र. ११४ अन्वये सादर करण्यात आला होता. त्यावरील ठराव**:** "शासन निर्णयाची नोंद घेण्यात आली", असा झालेला आहे.

सबब शासन निर्णय माहितीस्तव.)

**ठराव : शासन निर्णयाची नोंद घेण्यात आली.**

**[ २१ ] महाराष्ट्र शासनाने, अकृषि विद्यापीठे/अशासकीय अनुदानित महाविद्यालये यामधील अकृषि विद्यापीठातील अध्यापक/प्राचार्यांच्या निवड समितीमध्ये शासन प्रतिनिधीचा समावेश करण्याबाबत, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा शासन निर्णय क्र.एसयुके २०११/(५५४/११)विशि-१, दि.३०-०१-२०१२ माहितीस्तव.**

(टिपणी : महाराष्ट्र शासनाने, अकृषि विद्यापीठे/अशासकीय अनुदानित महाविद्यालये यामधील अकृषि विद्यापीठातील अध्यापक/प्राचार्यांच्या निवड समितीमध्ये शासन प्रतिनिधीचा समावेश करण्याबाबत कळविले आहे.

प्रस्तुत विद्यापीठांशी संलग्नित असलेले महाविद्यालये / संस्था इ. मधील अध्यापक / प्राचार्य यांच्या निवडीसाठी, विहित केलेल्या निवड समितीमध्ये तसेच करियर ॲडव्हान्समेंट स्कीम साठी विहित केलेल्या समितीमध्ये शासन प्रतिनिधी म्हणून संबंधित विभागीय सहसंचालकांचा समावेश करण्यात यावा. अन्यथा शासन प्रतिनिधी उपस्थित नसतांना अध्यापकांची केलेली निवड अवैध ठरविण्यात यावी व दिनांक १५/०१/२००१ च्या शासन परिपत्रकातील बाबींचे काटेकोर पालन करण्यात यावे, असे उक्त नमूद शासन निर्णय माहितीस्तव.)

**ठराव : शासन निर्णयाची नोंद घेण्यात आली.**

**[ २२ ] सन २०१०-११ चा लेखापरीक्षण अहवाल विचारार्थ.**

(टिपणी: सोलापूर विद्यापीठाचा सन २०१०-११ चा लेखापरीक्षण अहवाल, विद्यापीठाचे अंतर्गत लेखा परीक्षक मे. संकपाळ कुलकर्णी ॲन्ड असोसिएटस् यांनी कार्यालयास सादर केलेला आहे. सदरचा लेखापरीक्षण अहवाल सोबत जोडलेला आहे.

तो विद्यापीठ अधिनियम १९९४ कलम ७५ (२) (छ) (४) नुसार वित्त व लेखा समितीच्या माहितीसाठी व विचारार्थ सादर करण्यात आला असता त्यास दि.२८/०२/२०१२ च्या वित्त व लेखा समितीने लेखा आक्षेप पूर्तता उपसमितीच्या अभिप्रायासह पाठविण्याबाबत व्यवस्थापन परिषदेसाठी शिफारस केली आहे.

सबब सन २०१०-११ चा लेखापरीक्षण अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

ठराव : **सन २०१०-११ च्या वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवालाबाबत वित्त व लेखा समितीने व उपरोक्त उपसमितीने केलेली मान्यतेची शिफारस स्विकारण्यात येवून अधिसभेस शिफारस करण्यात आली.**

**<u>मा.कुलगुरुमहोदयांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय :</u>**

२३ (१) **बी. एस्सी. (बायोटेक्नॉलॉजी) या विषयाच्या परीक्षेत गुणानुक्रमे प्रथम येणा-या स्नातकास दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळ या संस्थेने संस्थापक यांच्या स्मृतीप्रित्यर्थ "कै. वि. गु. शिवदारे अण्णा सुवर्णपदक" यांच्या नावाने सुवर्णपदक देण्यासाठीची देणगी रक्कम व्यवस्थापन परिषदेने स्विकारणे व सदरचे सुवर्णपदक विद्यापीठ सुवर्णपदक यादीमध्ये समाविष्ट करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी - दि. १५/२/२०१२ रोजीच्या पत्रान्वये, दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळ सोलापूर यांचेकडून देणगी रु. १,००,०००/- (धनादेश क्र. २०६१४ सोलापूर सिध्देश्वर सहकारी बँक लि. सोलापूर रुपये एक लाख) विद्यापीठास प्राप्त झालेली आहे. सदर देणगी रक्कमेवर येणा-या व्याजातून प्रतिवर्षी दीक्षांत समारंभात प्रस्तुत अर्जात नमूद केल्याप्रमाणे दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळ या संस्थेने संस्थापक यांच्या स्मृतीप्रित्यर्थ "कै. वि. गु. शिवदारे अण्णा सुवर्णपदक" यांच्या स्मरणार्थ सुवर्णपदक देण्याची इच्छा व्यक्त केलेली आहे.

**सबब, महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (h) नुसार, व्यवस्थापन परिषदेने देणगी स्विकारणे व सदरचे सुवर्णपदक विद्यापीठ यादीमध्ये समाविष्ट करण्याची बाब विचारार्थ).**

ठराव : **बी. एस्सी. (बायोटेक्नॉलॉजी) या विषयाच्या परीक्षेत गुणानुक्रमे प्रथम येणा-या स्नातकास दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळ या संस्थेच्या संस्थापक यांच्या स्मृतीप्रित्यर्थ "कै. वि. गु. शिवदारे अण्णा सुवर्णपदक" यांच्या नावाने सुवर्णपदक देण्यासाठीची देणगी रक्कम रु.१,००,०००/- स्विकारण्यास मान्यता देण्यात आली. तसेच सदरचे सुवर्णपदक सुवर्णपदकाच्या यादीत समाविष्ट करण्यास मान्यता देण्यात आली.**

**२३ (२)** **सोलापूर विद्यापीठाचा सन २०१०-११ चा ७ वा वार्षिक मराठी अहवाल अधिसभेत सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने नामनिर्देशनाबाबत विचारार्थ.**

७ (**टिपणी** -सोलापूर विद्यापीठाचा सन २०१०-११ या वर्षाचा वार्षिक मराठी अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या दि.०२/०३/२०१२ रोजीच्या सभेत विषय क्र.८अन्वये, सादर करण्यात आला होता. सदरचा सन २०१०-११चा ७वा वार्षिक मराठी अहवाल अधिसभेच्या दि.२४/०३/२०१२ रोजीच्या सभेत सादर करण्यात येणार आहे.

सबब सदरचा वार्षिक अहवाल अधिसभेच्या सभेत सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने नामनिर्देशनाबाबत विचारार्थ).

**ठराव :** **सोलापूर विद्यापीठाचा सन २०१०-११ चा ७ वा वार्षिक मराठी अहवाल अधिसभेत सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने प्रा. डॉ. लोणीकर एस. व्ही. यांचे नामनिर्देशन करण्यात आले.**

**२३ (३)** **महाराष्ट्र शासनाच्या दि.१४ सप्टेंबर, २००९ रोजीच्या शासन राजपत्रानुसार, विविध अधिकारमंडळावर निवडून, नामनिर्देशनाद्वारे, स्वीकृत सदस्य म्हणून येण्याकरीता पात्रतेच्या अटी व शर्तीच्या व दीक्षांतसंदर्भातील सोलापूर विद्यापीठाने नव्याने तयार केलेले परिनियम अधिसभेत सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने नामनिर्देशनाबाबत विचारार्थ.**

(टिपणी: सोलापूर विद्यापीठाची स्थापना महाराष्ट्र शासनाच्या दि.२२ जुलै, २००४ रोजीच्या अधिसूचनेनुसार झालेली आहे. दि.२२ जुलै, २००४ रोजीच्या अधिसूचनेतील खालील कलमान्वये,
**(एक) या कलमान्वये शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांनी तयार केलेले केलेले परिनियम, अध्यादेश, विनियम आणि नियम यांचे सोलापूर विद्यापीठ सोलापूर यांच्याकडून उक्त अधिनियमाखालील अधिकारांचा वापर करुन अधिक्रम करण्यात येईपर्यंत किंवा त्यात फेरबदल करण्यात येईपर्यंत, ते अंमलात असणे चालू राहील आणि ते, उक्त अधिनियमान्वये सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्याकडून करण्यात आल्याचे मानण्यात येईल;**
वरील कलमानुसार, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांचेच परिनियम सोलापूर विद्यापीठाचे परिनियम म्हणून सध्या वापरण्यात येत आहेत. महाराष्ट्र शासनच्या दि.१४ सप्टेंबर, २००९ रोजीच्या शासन राजपत्रानुसार, विविध अधिकारमंडळावर निवडून, नामनिर्देशनाद्वारे, स्वीकृत सदस्य म्हणून येण्याकरीता पात्रतेच्या अटी व शर्ती पारीत केलेल्या आहेत. या अटी व शर्ती लागू करण्याकरीता मा.कुलगुरुमहोदयांनी महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम १४(८) नुसार ऑर्डर काढलेली होती. सोलापूर विद्यापीठाने शिवाजी विद्यापीठाचे असलेले परिनियम क्र. S.382 ते S.467 यामध्ये बदल करुन नव्याने सोलापूर विद्यापीठाचे परिनियम व त्याचे क्रमांक **SUSS.301 ते SUSS.387** असे आवश्यक ते बदल केलेले आहेत. तसेच शिवाजी विद्यापीठाचे दीक्षांतसंदर्भात असलेले परिनियम क्र. S.546 ते S.549 यामध्ये बदल करुन नव्याने सोलापूर विद्यापीठाचे परिनियम व त्याचे क्रमांक **SUSS.388** ते **SUSS.391** असे आवश्यक ते बदल केलेले आहेत.

सबब, परिनियम समितीने शिफारस केलेले सोलापूर विद्यापीठाचे परिनियम क्रमांक SUSS.301 ते SUSS.387 व SUSS.388 ते SUSS.391 हे अधिसभेच्या दि.२४/०३/२०१२ रोजी होणाऱ्या अधिसभेच्या सभेत सादर करण्यात येणार आहेत.

सबब, सदरचे परिनियम अधिसभेच्या सभेत सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने नामनिर्देशनाबाबत विचारार्थ).

**ठराव :** **सोलापूर विद्यापीठाने नव्याने तयार केलेले परिनियम व्यवस्थापन परिषदेच्या वतीने अधिसभेत सादर करण्यासाठी ॲड. श्री. सलगर बी. एस. यांचे यांचे नामनिर्देशन करण्यात आले.**

**२३ (४) सन २०११-१२ चे सुधारीत अंदाजपत्रक व २०१२-१३ चे मूळ अंदाजपत्रक अधिसभेत सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने नामनिर्देशनाबाबत विचारार्थ.**

(टिपणी: सन २०११-१२ चे सुधारीत अंदाजपत्रक व २०१२-१३ चे मूळ अंदाजपत्रक अधिसभेच्या दि.२४/०३/२०१२ रोजी होणाऱ्या अधिसभेच्या सभेत सादर करण्यात येणार आहेत.

सबब, सन २०११-१२ चे सुधारीत अंदाजपत्रक व २०१२-१३ चे मूळ अंदाजपत्रक अधिसभेच्या सभेत सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने नामनिर्देशनाबाबत विचारार्थ).

**ठराव : सन २०११-१२ चे सुधारीत अंदाजपत्रक व २०१२-१३ चे मूळ अंदाजपत्रक व्यवस्थापन परिषदेच्या वतीने अधिसभेत सादर करण्यासाठी प्राचार्य डॉ. भांजे बी. एम. यांचे नामनिर्देशन करण्यात आले.**

**२३ (५) सन २०१०-११ चा लेखापरीक्षण अहवाल अधिसभेत सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने नामनिर्देशनाबाबत विचारार्थ.**

(टिपणी: सन २०१०-११ चा लेखापरीक्षण अहवाल अधिसभेच्या दि.२४/०३/२०१२ रोजी होणाऱ्या अधिसभेच्या सभेत सादर करण्यात येणार आहेत.

सबब, सन २०१०-११ चा लेखापरीक्षण अहवाल अधिसभेच्या सभेत सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने नामनिर्देशनाबाबत विचारार्थ).

**ठराव : सन २०१०-११ चा लेखापरीक्षण अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या वतीने अधिसभेत सादर करण्यासाठी श्री. गायकवाड बी. आर. यांचे नामनिर्देशन करण्यात आले.**

**२३ (६) अधिसभा सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांवर कार्यालयाने तयार केलेली उत्तरे व सदरची उत्तरे अधिसभेच्या सभेत देण्याकरीता व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांचे नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: अधिसभा सदस्यांनी दि.२४ मार्च, २०१२ रोजी होणाऱ्या सभेकरीता प्रश्न पाठविलेले आहेत. सदर प्रश्नांची उत्तरे कार्यालयाने तयार केलेली आहेत. परिनियम ४७६ (८) नुसार सदर प्रश्नांची उत्तरे अधिसभेच्या सभेत व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांनी द्यावयाची आहेत.

सबब, अधिसभेच्या सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची कार्यालयाने तयार केलेली उत्तरे विचारार्थ व सदर प्रश्नांची उत्तरे अधिसभेच्या सभेत देण्याकरीता व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांचे नामनिर्देशनास्तव विचारार्थ).

**ठराव : सोबत जोडल्याप्रमाणे प्रश्नांची उत्तरे दुरुस्त करण्यात आली व अधिसभेमध्ये त्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी व्यवस्थापन परिषद सदस्यांचे नामनिर्देशन करण्यात आले.**

## अधिसभा सदस्यांनी विचारलेले प्रश्न व  त्यावर व्यवस्थापन परिषदेने तयार केलेली उत्तरे

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| **डॉ. चव्हाण सी. एस.** | | नाव : **डॉ. सूर्यवंशी ए. बी.** |
| १ | पी.एच.डी. करिताच्या रिसर्च सेंटर व रिसर्च प्लेस यांच्या प्रवेशाची नियमावली काय आहे? | प्रश्न संदिग्ध आहे. |
| २ | ६व्या वेतन आयोगाच्या शिफारशीप्रमाणे विद्यापीठाकडून वेतन निश्चिती व स्थाननिश्चिती केव्हा केली जाणार ? | • सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन निश्चिती पूर्ण करण्यात आली आहे. तद्वतच ५ व ६ व्या वेतन आयोगाप्रमाणे स्थान निश्चितीसाठी एकूण **२२७** प्रस्ताव प्राप्त झाले आहेत.<br>• मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर यांना दिनांक २३-०९-२०११, १४-११-२०११ व २०-१२-२०११ अन्वये स्थान निश्चिती निवड समितीसाठी शासनाच्या प्रतिनिधींचे नांव पाठविण्याबाबत विनंती करण्यात आली आहे. शासन प्रतिनिधींचे नांव प्राप्त होताच, स्थान निश्चिती शिबीर आयोजित करुन, वरिष्ठ निवड श्रेणीत स्थान निश्चिती करण्यात येईल. |
| **डॉ. बाड डी. आर.** | | नाव : **प्राचार्य डॉ. गणगे के. एन.** |
| ३ | १९९४ विद्यापीठ कायदयानुसार विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या महाविद्यालयात स्थानिक व्यवस्थापन समिती स्थापन करुन या समितीने आपल्या कामाचा अहवाल ३० जून पूर्वि विद्यापीठाला देणे बंधनकारक आहे. आतापर्यंत संलग्नित असणाऱ्या कीती महाविद्यालयांनी आपला अहवाल विद्यापीठाकडे पाठविलेला आहे.<br>• अहवाल पाठविला नसल्यास काय कारवाई केली. | सर्व संलग्नित महाविद्यालयात स्थानिक व्यवस्थापन समिती स्थापन केलेल्या आहेत तथापि आतापर्यंत एका संलग्नित महाविद्यालयाने सन २०१०-११ चा अहवाल सादर केलेला आहे.<br>या कार्यालयाच्या पत्रान्वये दि.१७.०३.२०१२ पूर्वी अहवाल सादर करणेबाबत कळविण्यात आले आहे. |

**२३ (७) विद्यापीठ परिसरातील जमीन शासन निर्णयानुसार आदिवासी (अनुसूचित) जमातीच्या विद्यार्थ्यांच्या नवीन शासकीय वसतिगृह सुरु करणे करीता देण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी : मा. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, घोडेगांव, ता. आंबेगावं, जि. पुणे यांनी आदिवासी विकास अधिपत्याखाली अनुसूचित जाती जमातीच्या विद्यार्थ्यासाठी जमीन विद्यापीठाची उपलब्ध करुन देण्याबाबत कळविण्यात आलेले होते. त्यानुसार मा.कुलगुरु महोदय यांचे मान्यतेने सदरची जागा हस्तांतर (Transfer) करण्याचे अधिकार, महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ८ (१) (ड) नुसार शासनाकडे असल्याने व विद्यापीठाचा स्वतःचा विकास (Development) करावयाचा असल्याने सदरची जागा देता येत नाही असे पत्रान्वये कळविण्यात आले होते. यानंतर मा.जिल्हाधिकारी, सोलापूर यांचे समवेत दि.१३/०२/२०१२ रोजीच्या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार विद्यापीठ कार्यालयाकडून दि.१८/०२/२०१२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई मा. मुख्य सचिव महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.२१/०२/२०१२ रोजी झालेल्या बैठकीतील १) महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठ परिसरात आदिवासी विकास विभागांच्या वसतीगृहाच्या बांधकामासाठी जमिनी उपलब्ध करण्याबाबत. २) आदिवासी विद्यार्थ्याकरिता बांधण्यात येणाऱ्या वसतीगृहांसाठी जमिनी उपलब्ध करण्याबाबत या विषयावर झालेल्या चर्चेनुसार विद्यापीठ जमिन देणेबाबत आदेश करण्यात आले आहेत.

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा, १९९४ कलम ८ (१) (ड) नुसार खालीलप्रमाणे नमूद करण्यात आलेले आहे.

८ (१) राज्य शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय,

(ड) स्थावर मालमत्तेची विक्री किंवा भाडेपट्टा याद्वारे, हस्तांतरण करणार नाही,

सबब आदिवासी जमातीच्या विद्यार्थ्याकरीता विद्यापीठ परिसरातील जमिन शासकीय वसतिगृह सुरु करणे करीता कलम ८ (१) (ड) नुसार खालील अटीवर उपलब्ध करुन देण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

१. सदर वसतीगृहाची इमारत (बांधकाम, विद्युतीकरण, आकस्मिक खर्च, मेस फर्निचर व इतर) खर्च शासनाने करावे.
२. सदर वसतीगृहात पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या आदिवासी समुदायातील विद्यार्थ्यांनांच प्रवेश देण्यात येईल.
३. जर काही जागा शिल्लक राहिल्यास त्या जागा विद्यापीठ मार्फतच इतर संवर्गातील विद्यार्थ्यांना प्रवेश देवून भरण्यात येईल.

सबब विद्यापीठ परिसरातील जमीन उपलब्ध करुन देणे बाबत व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव : विद्यापीठ परिसरातील जमीन हस्तांतर न करता शासन निर्णयानुसार आदिवासी (अनुसूचित) जमातीच्या विद्यार्थ्याच्या नवीन शासकीय वसतिगृह सुरु करण्यास खालील अटीवर मान्यता देण्यात आली.**

**१. सदर वसतीगृहाची इमारत (बांधकाम, विद्युतीकरण, आकस्मिक खर्च, मेस फर्निचर व इतर) खर्च शासनाने करावे.**
**२. सदर वसतीगृहात पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या आदिवासी समुदायातील विद्यार्थ्यांनांच प्रवेश देण्यात येईल.**
**३. जर काही जागा शिल्लक राहिल्यास त्या जागा विद्यापीठ मार्फतच इतर संवर्गातील विद्यार्थ्यांना प्रवेश देवून भरण्यात येईल**

**२३ (८) विद्यापीठ परिसरात अल्पसंख्याक मुलींसाठी नवीन शासकीय वसतिगृह सुरु करणेची बाब विचारार्थ.**

(टिपणी : महाराष्ट्र शासन, अल्पसंख्याक विकास विभाग, यांचे दि.०२/०३/२०१० रोजीच्या शासन निर्णयानुसार अल्पसंख्याक बहुल क्षेत्रामध्ये अल्पसंख्याक समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या मूलींसाठी वसतीगृहे सुरु करण्याबाबत योजना राबविण्यात येणार असुन विद्यापीठ परिसरातील जमीन उपलब्ध करुन देणेबाबत कळविण्यात आले होते. यानंतर अल्पसंख्याक विकास विभाग मंत्रालय, मुंबई यांना दि.०९/०८/२०११ रोजी विद्यापीठाच्या अटी नुसार कळविण्यात आले होते. यानंतर मा. कुलगुरु महोदय यांचे मान्यतेने मा.अवर सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना दि.०५/१०/२०११ रोजी अभिप्राय कळविण्यात आलेला आहे.

सबब अल्पसंख्याक मुलींसाठी विद्यापीठ परिसरात शासकीय वसतिगृह सुरु करणेची बाब खालील अटीवर व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

१. विद्यापीठास शासनाने अल्पसंख्याक समाजातील मुलींच्या वसतिगृहासाठी निधी (बांधकाम, विद्युतीकरण, आकस्मिक खर्च व इतर) उपलब्ध करुन दिल्यास विद्यापीठामार्फत बांधकाम केले जाईल.
२. सदर जमिनीवर विद्यापीठाची मालकीची राहणार असून जमीनी बाबतचे हक्क व अधिकार हे विद्यापीठाकडे राहतील व कोणासही कसल्याही परिस्थितीत हस्तांतर केले जाणार नाहीत व त्याबाबत कोणत्याही प्रकारे मागणी करता येणार नाही.
३. सदर वसतिगृहाची इमारती बाबतचे सर्व हक्क व अधिकार विद्यापीठाकडे राहील.
४. सदर वसतिगृहातील मेस व इतर जरुरीचे फर्निचर तसेच सदर वसतिगृह चालविण्यासाठी लागणार साहित्य खरेदीसाठी देखील याबाबत शासनाने निधी उपलब्ध करुन द्यावी.
५. सदरचे वसतिगृह चालविण्यासाठी विद्यापीठ सक्षम असल्याने याबाबत वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करणे विद्यापीठांवर बंधनकारक राहणार नाही व सदरचे वसतिगृह हे विद्यापीठामार्फतच चालविणेत येईल.
६. सदर वसतिगृहात पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्याक समुदायातील मुलींनाच प्रवेश देण्यात येईल व जर काही जागा शिल्लक राहिल्यास त्या जागा विद्यापीठामार्फतच इतर संवर्गातील मुलींना प्रवेश देवून भरण्याची राहील.

वरीलप्रमाणे मान्य झालेस व निधी उपलब्ध झालेनंतर विद्यापीठामार्फतच बांधकाम करुन वसतिगृह विद्यापीठामार्फत चालविणेत येईल.

सबब वरीलप्रमाणे कळविण्यात आलेल्या अभिप्रायानुसार व शासन निर्णयानुसर विद्यापीठ परिसरात अल्पसंख्याक मुलींसाठी शासकीय वसतिगृह सुरु करणेची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव : विद्यापीठ परिसरात अल्पसंख्याक मुलींसाठी नवीन शासकीय वसतिगृह खालील अटीवर सुरु करण्यास मान्यता देण्यात आली.**

**१. विद्यापीठास शासनाने अल्पसंख्याक समाजातील मुलींच्या वसतिगृहासाठी निधी (बांधकाम, विद्युतीकरण, आकस्मिक खर्च व इतर) उपलब्ध करुन दिल्यास विद्यापीठामार्फत बांधकाम केले जाईल.**
**२. सदर जमिनीवर विद्यापीठाची मालकीची राहणार असून जमीनी बाबतचे हक्क व अधिकार हे विद्यापीठाकडे राहतील व कोणासही कसल्याही परिस्थितीत हस्तांतर केले जाणार नाहीत व त्याबाबत कोणत्याही प्रकारे मागणी करता येणार नाही.**
**३. सदर वसतिगृहाची इमारती बाबतचे सर्व हक्क व अधिकार विद्यापीठाकडे राहील.**
**४. सदर वसतिगृहातील मेस व इतर जरुरीचे फर्निचर तसेच सदर वसतिगृह चालविण्यासाठी लागणार साहित्य खरेदीसाठी देखील याबाबत शासनाने निधी उपलब्ध करुन द्यावी.**
**५. सदरचे वसतिगृह चालविण्यासाठी विद्यापीठ सक्षम असल्याने याबाबत वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करणे विद्यापीठांवर बंधनकारक राहणार नाही व सदरचे वसतिगृह हे विद्यापीठामार्फतच चालविणेत येईल.**
**६. सदर वसतिगृहात पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्याक समुदायातील मुलींनाच प्रवेश देण्यात येईल व जर काही जागा शिल्लक राहिल्यास त्या जागा विद्यापीठामार्फतच इतर संवर्गातील मुलींना प्रवेश देवून भरण्याची राहील.**

**२३ (९) दि.१७/०२/२०१२ रोजी झालेल्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत विचारार्थ.**

(टिपणी:दि.१७/०२/२०१२ रोजीच्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत दि.२१/०२/२०१२ रोजीच्या वित्त व लेखा समितीसमोर विषय क्र. ०२ नुसार मान्यतेच्या शिफारशीसाठी ठेवला असता त्यावर खालीलप्रमाणे ठराव झाला.

**ठरावः** खरेदी समिती ठराव क्र. २ ते ८ साठी ज्या पुरवठादारांनी निविदा भरलेल्या आहेत त्या पुरवठादांराकडे प्रत्यक्ष भेट देवून, पुरवठादारांची काम करण्याची पात्रता, वापरण्यात येणाऱ्या साहित्याचा दर्जा व यापूर्वी त्यांनी केलेली कामे इ. बाबींची तपासणी करुन गुणानुक्रमे अहवाल सादर करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली होती.

१) श्री. बी. आर. गायकवाड
२) डॉ. आर. आर. पाटील
३) डॉ. पी. व्ही. साळुंखे
४) इंजि. जी. ए. कुलकर्णी

उपरोक्त समितीने गुणानुक्रमे अहवाल पुढील सभेत सादर करण्याचे ठरले.

त्यानुसारच्या समितीने दि.२५/०२/२०१२ रोजी मे. श्रध्दा इंडस्ट्रीज, सांगली येथे भेट देवून उपरोक्त बाबींची तपासणी करुन अहवाल सादर केला असून तो सोबत जोडला आहे.

सबब, दि.१७/०२/२०१२ रोजीच्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत दि.२८/०२/२०१२ रोजीच्या वित्त व लेखा समितीच्या पुनश्चः विचारार्थ ठेवला असता, त्यावर खालीलप्रमाणे ठराव झाला.

**ठरावः** दि.१७/०२/२०१२ रोजीच्या खरेदी समितीच्या कार्यवृत्तांतातील ठराव क्र. २ ते ८ साठी करण्यात आलेली प्रक्रिया रद्द करुन नव्याने प्रक्रिया करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

सबब, दि.१७/०२/२०१२ रोजीच्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव : दि.१७/०२/२०१२ रोजीच्या खरेदी समितीच्या कार्यवृत्तांताबाबत वित्त व लेखा समितीने व उपरोक्त उपसमितीने केलेली शिफारस स्विकारुन मान्यता देण्यात आली.**

मा.कुलगुरु यांच्या परवानगीने सभा संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

**सही/-**
**सचिव**
**व्यवस्थापन परिषद**

**सही/-**
**अध्यक्ष**
**व्यवस्थापन परिषद**